॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव १२ (     ) शिबीरातून चांगला विचार करण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होते आणि त्यातूनच उत्तम माणूस घडतो असे प्रतिपादन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील स्वामी विवेकानंद अध्ययन व संशोधन केंद्र आणि आशा फाऊंडेशन यांच्यातर्फे `मला काही शिकायचंय` या विषयावरील निवासी शिबीराच्या समारोप प्रसंगी व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.नितीन बारी यांनी केले.

विद्यापीठातील अध्ययन व संशोधन केंद्र आणि आशा फाऊंडेशन यांच्यातर्फे ५ ते ९ जून, २०१९ या कालावधीत `मला काही शिकायचंय` या विषयावरील निवासी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. आज या शिबीराचा समारोप होता. यावेळी व्यासपीठावर प्रा.नितीन बारी, प्रा.मनिष जोशी व आशा फाऊंडेशनचे गिरीष कुळकर्णी उपस्थित होते. पुढे बोलताना प्रा.बारी म्हणाले की, आयुष्यातील आव्हाने पेलण्यासाठी व त्यांना सामोरे जाण्यासाठी अशा शिबीरांमधून बळकट निर्माण होते. तसेच मुलांमधील ॲटीट्युडही बदलतो. यासाठी पालकांनी मुलांसमवेत मनमोकळे पणाने बोलले पाहिजे, त्यांच्याशी चर्चा केली पाहिजे तसेच त्यांना बोलू द्यायला हवे,  त्यांचे विचार मोकळे करू द्या, त्यांना समजून घ्या यासोबतच मुलं काय शिकताय हे त्यांच्या पध्दतीने शिकू द्या, त्यांच्या आवडीचे त्यांना करू द्या, विद्यार्थ्यांना अशा शिबीरांमध्ये पाठवा असे ते यावेळी म्हणाले. प्रा.मनिष जोशी यांनी स्वामी विवेकानंद अध्ययन केंद्रातर्फे विविध महापुरूषांचे विचार व प्रसार करण्याचे कार्य करण्यात येते. तसेच सामाजिक संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल घडविण्यासाठी शिबीरांचे अयोजन करण्यात येत असते. यासोबतच विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम व समाजाभिमुख प्रकल्प राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी सहभागी विद्यार्थ्यांनी आत्महत्या, भारताचा विकास, व्यसन, मानवी तस्करी या विषयांवर गट निहाय सादरीकरण केले. उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या गटास पारितोषिक देवून गौरविण्यात आले. उत्कृष्ट सादरीकरण प्रथम गट - एवन ग्रुप, द्वितीय सादरीकरण गट- सेव्हन स्टार तर उत्कृष्ट शिबीरार्थी - अद्वित्या पाटील, इशम करंजीकर, बेस्ट मोटीव्हेट स्टुडन्ट- निनाद गव्हाले, सिध्दी मुळे, श्रीकृष्ण बारी व अश्लेषा यावलकर यांना देण्यात आले.

सहभागी विद्यार्थ्यांमधून सिध्दी मुळे, अद्वित्या पाटील, अजिंक्य पाटील, निनाद गव्हाले, इशम करंजीकर यांनी तर पालकांमधून राजेश यावलकर, दिपाली खडके, अनघा पाटील यांनी मनोगत व्यक्त केली. पाहुण्यांचा परिचय सुमित परदेशी याने केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गिरीष कुळकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीकृष्ण बारी व अश्लेषा यावलकर यांनी केले तर आभार गिरीष कुळकर्णी यांनी मानले. शिबीर यशस्वीतेसाठी वसुधा सराफ, तुषार पाटील यांनी सहकार्य केले.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : १२ जून, २०१९

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या  दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी